# प्रेस नोट

दि. १७/०९/२०१८

## पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये नागरिकांच्या सुविधे करीता सिटीझन पोर्टल ऑनलाईन सुविधा केंद्र सुरू

पुणे शहर पोलीस आयुक्तालया तर्फे महाराष्ट्र पोलीस दलाचे वेबपोर्टल https://www.mhpolice.maharashtra.gov.in ची प्रसिद्धी करणे करीता दि. १७/०९/२०१८ रोजी स्वतंत्र किओस्क सेंटरची उभारणी करण्यात आलेली आहे.सदर किओस्क सेंटर पोलीस आयुक्तालयाचे गेट नं.०३ शेजारी सूरु करण्यात आलेले आहे.

पुणे आयुक्तालयामधील "किऑस्क सेंटर" च्या मदतीने नागरिकांना "सिटीझन पोर्टल" या टॅब अंतर्गत देण्यात आलेल्या विविध सेवांची माहिती करून देण्याच्या उद्देशाने उभारणी करण्यात आलेली आहे.

तसेच **"किऑस्क सेंटर"** मधून नागरिकांना "सिटीझन पोर्टल" या टॅबमध्ये उपलब्ध असलेल्या खालील प्रकारच्या सेवांची माहिती देणे करीता उभारणी करण्यात आलेली आहे. त्या करीता नागरिकांनी त्यांची वैयक्तिक माहीती भरून नोंदणी केल्यानंतर त्यांना लाभ घेता येणार आहे,त्याकरिता आवश्यक ती मदत या सेंटरव्दारे करण्यात येणार आहे.सदर वेबसाईट व्दारे नागरिकांना खालील सुविधां / सेवा वापरता येणार आहेत.

१. ई तक्रार व ई तक्रारची सदयस्थिती
२. हरविलेली व्यक्ती
३. बेवारस मयत
४. अटक आरोपीं व फरारी व्यक्तींची माहिती
५. विविध उत्सव परवाने
६. मोबाईल मिसींग
७. एफ.आय.आर
८. महाराष्ट्रातील पोलीस घटकांची संकेतस्थळांची माहिती
९. ऑन लाईन सेवा.
१०.विविध नमुना अर्ज.

वरील सर्व सेवांचा नागरिक घरबसल्या अथवा आपल्या मोबाईलव्दारे कोठुन ही लाभ घेवु शकतात. तरी नागरिकांना आवहान करण्यात येते की ते महाराष्ट्र पोलीस दलाचे **https://www.mhpolice.maharashtra.gov.in** वेबसाईट वर जावून जास्तीत जास्त सुविधांचा लाभ घेतील. त्यामध्ये काही अडचण आल्यास ते सदर **किऑस्क सेंटरला** भेट देऊन पोर्टल वापरताना येणा-या अडचणी सोडविणेबाबत पोलीसांकडुन मार्गदर्शन घेतील.

नमूद **"किऑस्क सेंटर"** चा उद्घाटन समारंभ मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त यांचे हस्ते पार पडला असून नमूद वेळी श्री. साहेबराव पाटील, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर, गुन्हे, श्री. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्री. शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय – २, श्री. निलेश मोरे, सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर, गुन्हे, पुणे शहर यांचे उपस्थित पार पडला आहे.


KIOSK CENTER


पोलीस आयुक्तालय, पुणे
पुणे पोलीस
सिटीजन पोर्टल ऑनलाईन सुविधा केंद्र
KIOSK CENTER
। उद्घाटन समारंभ।
दि. १७/०१/२०१८
मा. श्रीमती रश्मी शुक्ला, भा.पो.से.
पोलीस आयुक्त, पुणे शहर
यांचे शुभहस्ते
। प्रमुख उपस्थिती ।
मा.रविंद्र कदम भा.पो.से.












महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल
MAHARASHTRA POLICE CITIZEN PORTAL



